हरियाणा स्टीलर्सची विजयाची हॅट्रीक! अटीतटीच्या लढतीत पुणेरी पलटनचा ४ गुणांनी पराभव

जयपूर, १९ सप्टेंबर २०२५: प्रो कबड्डी २०२५ स्पर्धेतील १२ व्या हंगामात रायव्हलरी विक सुरू आहे. या स्पर्धेतील ४१ वा सामना पुणेरी पलटन आणि हरियाणा स्टीलर्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. पीकेएलच्या १० व्या हंगामातील चॅम्पियन आणि पीकेएलच्या ११ व्या हंगामातील दोन्ही चॅम्पियन संघ आमनेसामने होते. त्यामुळे दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत होणार यात काहीच शंका नव्हती. पुणेरी पलटनने पूर्ण जोर लावला. पण गेल्या हंगामातील चॅम्पियन संघ पुणेरी पलटनवर भारी पडला. हा सामना हरियाणा स्टीलर्सने ३४-३० च्या फरकाने आपल्या नावावर केला.

जयपूरच्या एसएमएस इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात हरियाणा स्टीलर्सकडून विनयने सर्वाधिक १३ गुणांची कमाई केली. तर शिवम पाठारेने ८ गुणांची कमाई केली. पुणेरी पलटनकडून पंकज मोहिते चमकला. त्याने सर्वाधिक १४ गुणांची कमाई केली. पण पुणेरी पलटनला हा सामना गमवावा लागला आहे.

या सामन्यात पुणेरी पलटनकडून अस्लम इनामदारने पहिली चढाई केली. पण पहिल्याच चढाई हरियाणा स्टीलर्सने त्याची पकड करत संघाचं खातं उघडलं. त्यानंतर विनयने चढाई करताना १ गुण घेतला. सामन्यातील चौथ्या मिनिटाला १ गुण घेत पुणेरी पलटनने आपलं खातं उघडलं. सुरुवातीच्या ५ मिनिटात हरियाणा स्टीलर्सचा बोलबाला पाहायला मिळाला. हरियाणाकडे ६-२ गुणांसह ४ गुणांची आघाडी होती. सामन्यातील सातव्या मिनिटाला पुणेरी पलटनचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह स्टीलर्सने ११-२ गुणांसह ९ गुणांची आघाडी घेतली. पुर्वार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर हरियाणाकडे १४-४ गुणांसह १० गुणांची आघाडी होती.

पुर्वार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटात पिछाडीवर राहिलेल्या पुणेरी पलटनने पुनरागमन करण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. शेवटच्या ५ मिनिटात ही पिछाडी १७-९ ने कमी केली. पुर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर हरियाणा स्टीर्सने १९-१० गुणांसह १० गुणांची आघाडी घेतली.

उत्तरार्धात दोन्ही संघांनी दमदार सुरुवात केली. १-१ गुण घेण्यासाठी दोन्ही संघांमध्ये चांगलीच स्पर्धा रंगली. सुरूवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दोन्ही संघांनी एकूण गुणसंख्येत केवळ २-२ गुणांची भर घातली. हरियाणा स्टीलर्सचा संघ २१-१२ ने आघाडीवर होता. सातव्या मिनिटाला पंकज मोहितेने चढाईत २ गुण घेत आघाडी कमी केली. उत्तरार्धातील सुरूवातीच्या १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर हरियाणा स्टीलर्सचा संघ २५-१६ ने आघाडीवर होता. पुणेरी पलटनला उत्तरार्धातील १२ व्या मिनिटापर्यंत डू ओर डाय रेडमध्ये एकही गुण घेता आला नव्हता. शेवटी पंकज मोहितेने १३ व्या मिनिटाला डू ओर डायमध्ये पहिला गुण घेतला.

पंकज मोहितेने पुणेरी पलटनला पुनरागमन करून दिलं. शेवटची ६ मिनिटे शिल्लक असताना त्याने २ गुणांची कमाई केली. हरियाणा स्टीलर्सवर ऑलआऊट होण्याचं संकट ओढावलं होतं. पंकजने आपलं सुपर १० पूर्ण करत ४ गुणांची कमाई केली आणि हरियाणाला पहिल्यांदा ऑलआऊट केलं. यासह पुणेरी पलटनची पिछाडी २७-२५ ने कमी केली. शेवटच्या ४ मिनिटात हरियाणाकडे केवळ २ गुणांची आघाडी होती.

चढाईत पंकज मोहितेने गुण आणले, पण बचावात पुणेरी पलटनला हवी तशी कामगिरी करता आली नाही. शेवटची २ मिनिटे शिल्लक असताना हरियाणाकडे २९-२७ गुणांसह केवळ २ गुणांची आघाडी होती. शेवटच्या मिनिटाला हरियाणाकडे ३ गुणांची आघाडी होती. शेवटी हरियाणाने हा सामना ३४-३० च्या फरकाने जिंकला.